# शिक्षण विभाग ( प्राथमिक ), जिल्हा परिषद, कोल्हापूर.

## राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशाला अंतर्गत

## मैदानी क्रीडा प्रशिक्षक ( ॲथलेटिक्स) भरती सन २०१७-२०१८

जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे मार्फत राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रिडा प्रशाला, शिंगणापूर, ( चंबुखडी ), ता- करवीर , जिल्हा कोल्हापूर येथे चालू करण्यात आलेली असून त्याठिकाणी तात्पुरत्या स्वरुपातील कंत्राटी **मैदानी क्रीडा प्रशिक्षक ( ॲथलेटिक्स)** नियुक्त करणेचे आहेत. त्यासाठी पात्र उमेदवारांनी विहित मुदतीत लेखी अर्ज करावेत.

भरतीबाबतची सविस्तर माहिती व जाहिरात **www.zpkolhapur.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/- | | सही/- |
| सदस्य सचिव | | अध्यक्ष |
| राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व | | राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व |
| निवासी क्रीडा प्रशाला, शिगणापूर तथा | सही/- | निवासी क्रीडा प्रशाला, शिगणापूर तथा |
| शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| जिल्हा परिषद,कोल्हापूर. | जिल्हा परिषद कोल्हापूर. | जिल्हा परिषद,कोल्हापूर. |

**( जाहिरात क्रमांक -१ )**

**राजश्री शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशाला, ( चंबुखडी), शिंगणापूर, ता- करवीर, जिल्हा - कोल्हापूर. कडे कंत्राटी तात्पुरत्यास्वरुपाची निवासी मैदानी क्रीडा प्रशिक्षक (अॅथलेटिक्स) भरती जाहिरात सन २०१७-२०१८**

जिल्हा परिषद, कोल्हापूर संचलित राजश्री शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशाला, (चंबुखडी), शिंगणापूर, ता- करवीर जिल्हा कोल्हापूर येथे निवासी मैदानी क्रीडा प्रशिक्षक (अॅथलेटीक्स) एका पदासाठी नियुक्ती करण्यात येणार आहे. सदरची नियुक्ती हि पुर्णत: कंत्राटी मानधन तत्वावरील निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची नियुक्ती असणार आहे. त्यासाठी मासिक एकत्रित मानधन कार्यकारीणी समिती सभेमध्ये निश्चीत करण्यात येईल.

जाहिरात दिलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पुर्ण करीत असलेल्या अनुभवी उमेदवारांनी सोबत दिलेल्या नमुन्यात अर्ज करावेत. सदरचा अर्ज दिलेल्या विहीत नमुन्यात टंकलिखीत करुन **दि. १०/०२/२०१८ ते दि. २१/०२/२०१८** अखेर सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.०० पर्यंत या वेळेत कार्यालयीन दिवशी समक्ष अथवा पोष्टाने **मुख्याध्यापक, राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशाला, शिंगणापूर, ता- करवीर, जिल्हा परिषद, कोल्हापूर** येथे स्विकारले जातील. **दि. २१/०२/२०१८** या तारखेनंतर येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. सदरची जाहिरात जिल्हा परिषद, कोल्हापूर च्या **www.zpkolhapur.gov.in** या संकेतस्थळार उपलब्ध आहे.

मैदानी क्रीडा प्रशिक्षक (अॅथलेटीक्स) भरती बाबतची घटना व नियमावलीप्रमाणे अटी व नियमावली थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) मैदानी क्रीडा प्रशिक्षक (अॅथलेटीक्स) हे तज्ञ, अनुभवी व ज्यांनी राष्टीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अतिउत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. मैदानी या खेळामध्ये N.I.S.पदविका प्राप्त/ पदविका धारण करणारेच उमेदवारांनी अर्ज करावेत. तसेच आतंरराष्ट्रीय खेळाडूना प्राधान्य देणेत येईल. सदर कामाचा तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक असून बंधनकारक आहे. तसेच राज्यराष्ट्रीय खेळाडूंचा विचार केला जाईल. पण नियुक्तीचा अंतिम निर्णय कार्यालयाने राखून ठेवला आहे.

२) या पदासाठी कार्यालयाने ठरवून दिलेल्या वेळेत तसेच आवश्यकत्यावेळी कार्यालयाचे काम जादा वेळेत पुर्ण करणे बंधनकारक राहील, त्यासाठी कोणत्याही प्रकारचे अतिरीक्त किंवा जादा मानधन आदा केले जाणार नाही.

३) क्रीडा प्रशिक्षकांना विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशालेमध्ये दररोज सकाळी ६ ते ९ आणि सायंकाळी ४ ते ७ या वेळेत तसेच वेळोवेळी आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यासोबत स्पर्धेसाठी आणि सरावासाठी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. क्रिडा प्रशिक्षकांना सुटटीमध्येदेखील काम करणे बंधनकारक राहील.

४) प्रशिक्षकांचे मानधन जि.प.च्या ठेवीवरील प्राप्त होणारे व्याजातून खर्ची टाकणेत येईल.

५) मैदानी क्रीडा प्रशिक्षक (अॅथलेटीक्स) यांची नियुक्ती हि पुर्णत: तात्पुरती आणि कंत्राटी मानधन तत्वावरील असल्यामुळे कोणत्याही उमेदवाराला सेवेत कायम करण्याचा किंवा नियमित सेवेचा कोणताही लाभ अनुज्ञेय असणार नाही आणि कायमस्वरुपी नियुक्ती दिली जाणार नाही याची उमेदवारानी नोंद घ्यावी. तसेच निवड झालेल्या उमेदवारांकडून रु. १००/- स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन घेणेत येणार आहे.

६) मैदानी क्रीडा प्रशिक्षक (अॅथलेटीक्स) दि. ३१मार्च २०१८ रोजी वय किमान ४५ वर्षाचे आत असणे आवश्यक आहे.

७) जाहिरातीमधील नमुन्यामध्येच अर्ज करणे बंधनकारक आहे. त्यासोबत आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रत सत्य प्रत (True Copy) करुन जोडणेचे आहेत, अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची छाननी करुन पात्र

असणारे उमेदवारांची यादी जि.प.कडील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल, आणि शक्य झालेस जि.प. कोल्हापूरच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. लेखी किंवा तोडी मुलाखतीसाठी कोणत्याही प्रकारचा भत्ता किंवा प्रवास खर्च कार्यालयाकडून दिली जाणार नाही तो स्वत: उमेदवाराने करणेचा आहे नोंद घ्यावी.

८) उमेदवारांनी वरील अट क्र. १ व २ नुसारच पात्र असणारे अर्ज करावेत अर्धवट किंवा अपुरी कागदपत्रांची अर्ज ग्राहय मानले जाणार नाहीत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९) सदरची भरतीबाबत स्थानिक वृत्तपत्रामध्ये जिल्हास्तरावरुन जाहिरात देऊन करणेत येईल.

१०) नियुक्त केलेल्या उमेदवाराचा कालावधी पुर्ण झालेनंतर मुदतवाढ देणे किंवा कसे याबाबतचा निर्णय कार्यालयाने राखून ठेवला आहे.

**१) अर्ज करावयाची पध्दत :-**

**१)** अर्ज A-४ साईज पेपरवर दिलेल्या नमुन्यातच टंकलिखित केलेला असावा.

**२)** अर्जावरिल फोटो अलीकडील आणि तो राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकित करणे बंधनकारक आहे.

**३)** अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, वयाचा पुरावा, अनुभवाचा दाखला, डोमेसाईल प्रमाणपत्र, माजी सैनिकांचे प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, भुकंपग्रस्त प्रमाणपत्र, खेळाडू प्रमाणपत्र, स्वातंत्रसैनिक पाल्य प्रमाणपत्र, अंशकालीन प्रमाणपत्र अनुभव दाखला इत्यादीच्या प्रति साक्षांकित केलेल्या प्रती जोडाव्यात. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील पदासाठी अर्ज करताना अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र अथवा जात प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.

**४)** प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करण्यात यावा.

**५)** अर्जाच्या लिफाफयावर ज्या पदासाठी अर्ज केलेला असेल त्या पदाचा, खेळाचा प्रकार उल्लेख करण्यात यावा.

**विशेष सुचना :-**

१) सदरची नियुक्ती हि कंत्राटी आणि मानधन तत्वावरील फक्त ११ महिन्यासाठी मर्यादित असल्याने नंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२) निवडीबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास / शिफारसपत्र आणल्यास उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल.

३) प्राप्त अर्जामधून तयार करण्यात आलेली प्रतिक्षा यादी एक वर्षासाठी मर्यादित राहील.

४) अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख २१/०२/२०१८ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत असेल. मुदतीनंतर समक्ष अथवा पोष्टाने आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

५) विहीत नमुन्यात नसलेले अर्ज रद्द समजण्यात येतील.

६) अर्जात पत्रव्यवहाराचा पत्ता जवळच्या खुणेसह ( Land Mark ) नमूद करावा. संपर्कासाठी भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवावा. तसेच स्वत:चा ई मेल आयडी असलेस नमूद करावा.

७) अपुर्ण व चुकीची माहिती भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. तसेच अपात्रतेबाबत कोणत्याही प्रकारे या कार्यालयाकडून पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८) अर्जासोबत जोडावयाच्या शैक्षणिक त्याचप्रमाणे व्यावसायिक पात्रतेचे व इतर दाखले यांच्या प्रती सांक्षाकित करुनच अर्जासोबत जोडण्यात याव्यात. झेरॉक्स प्रत सत्य प्रत न केलेस अर्ज अपात्र ठरविण्यात येईल आणि याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

९) आरक्षणाचा लाभाकरीता त्या त्या प्रवर्गात मोडत असलेल्या उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र सादर करावे.

१०) उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

११) सेवा निवृत्त क्रीडा अधिकारी किंवा मैदानी क्रीडा प्रशिक्षकांना ( ॲथलेटिक्स) प्राधान्य देणेत येईल.

**या पदाकरीता सुचना :-**

१) (अ) शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०,दि.२७जून२०११ नुसार ज्या उमेदवाराकडे डोमीसाईल प्रमाणपत्र उपलब्ध नसलेस त्याने त्यांचा जन्म महाराष्ट्रात झाला असल्यास दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात डोमीसाईल प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

(ब) सदर उमेदवाराकडे जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद आवश्यक आहे.

(क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्रात राज्यात जन्म झालेल्या उमेदवाराला लागू राहील.

२) सेवा योजन कार्यालय, आदिवासी प्रकल्प अधिकारी, जिल्हा अधिकारी यांचेकडून प्राप्त होणा-या जनगणना, अंशकालीन कर्मचारी, प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, जिल्हा सैनिक कल्याण बोर्ड, यांचेकडून शिफारस होणा-या उमेदवारांनी त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार जाहीरातीप्रमाणे अर्ज करणे बंधनकारक आहे.

३) प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारानी संबंधित जिल्हयातील मा. जिल्हाधिकारी / जिल्हा पुनवर्सन अधिकारी यांचेकडील प्रकल्पगस्त व भुकपंग्रस्त प्रमाणपत्राच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडणेच्या आहेत. अन्यथा अर्ज अपात्र समजण्यात येईल. तसेच प्रमाणपत्र पडताळणीनंतर नियुक्ती ओदश देणेत येतील.

४) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. १ जुलै २००५ नुसार लहान कुटुंब असलेचे प्रमाणपत्र खाली दिलेल्या नमुन्यामध्ये अर्जासोबत स्वतंत्ररित्या आवश्यकत्या कागदपत्रासह सादर करणे आवश्यक राहील.

५) मैदानी क्रीडा प्रशिक्षक (ॲथलेटीक्स) चे मानधन हे निवासी प्रशालेकडील कार्यकारीणी समिती सभेमध्ये जे ठरविण्यात येईल ते अदा करणेत येईल.

६) सदरची नियुक्ती पुर्णतः कंत्राटी आणि मानधन तत्वावरील तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे उमेदवाराचे काम समाधानकारक नसलेस कोणतेही कारण किंवा लेखी सुचना न देता नियुक्ती रद्द करणेत येईल, याबाबत कोणत्याही प्रकारे आणि कोठेही तक्रार करता येणार आहे, आणि कोणतेही राजकिय दबाव आणता येणार नाही.

७) नियुक्तीचे सर्व अधिकारी जिल्हा परिषद, कोल्हापूर ने आपल्याकडे राखून ठेवले आहेत.

सही/-
सदस्य सचिव
राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व
निवासी क्रीडा प्रशाला, शिगणापूर तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,कोल्हापूर.

सही/-
अध्यक्ष
राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व
निवासी क्रीडा प्रशाला, शिगणापूर तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,कोल्हापूर.

**<u>नमुना खाली दिला आहे.</u>**

महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना -अ

मी श्रीमती / कुमारी -------------------------------------------- श्री ------------ --------------------------------- यांची पत्नी / मुलगा / मुलगी वय ------वर्ष राहणार ------- ----------------------------------------- याद्वावरे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते कि,

१) मी **<u>कंत्राटी मैदानी क्रीडा प्रशिक्षक (ॲथलेटीक्स)</u>** या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ----------- ( संख्या ) इतकी हयात मुले आहेत. त्यापेकी दि. २८ मार्च २००५ तदनंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ---------- आहे ( असल्यास जन्म दिनाक नमुद करावा. )

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि. २८ मार्च २००५ तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-
दिनांक :- उमेदवाराची स्वाक्षरी

उमेदवाराचे संपुर्ण नांव :--------------------------------

१) अंतिम निवड यादीतील उमेदवारांची मुळ कागदपत्रे पडताळणी केलेशिवाय नियुक्ती दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
२) एखादा उमेदवार त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव आणलेस त्यास निवड प्रक्रियेतून वगळणेत येईल.
३) मुलाखतीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची निवड यादी ही जिल्हा परिषद, कोल्हापूर येथे नोटीस बोर्डावर तसेच जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळा <u>www.zpkolhapur.gov.in</u> वर प्रसिध्द करण्यात येईल.
४) जाहीरातीमधील काही बाबी विषयी शंका असल्यास याबाबत सदस्य सचिव तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना कार्यालयीन दिवशी व वेळेत समक्ष भेटावे.

उमेदवाराने अलिकडील काळातील आयडेंटी साईज फोटो लावावा व तो राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकित करावा.

**शिक्षण विभाग (प्राथमिक ) - जिल्हा परिषद, कोल्हापूर**

# अर्जाचा नमूना

**कंत्राटी मैदानी क्रीडा प्रशिक्षक (ॲथलेटीक्स) पदासाठीचा अर्ज-२०१७.**

**प्रति,**

सदस्य सचिव, कार्यकारी नियामक समिती, कोल्हापूर.
तथा शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ),
जिल्हा परिषद,कोल्हापूर.

**भरतीचे पदाचे नांव :- कंत्राटी मैदानी क्रीडा प्रशिक्षक (ॲथलेटीक्स)**

१) उमेदवाराचे संपुर्ण नांव :- आडनांव स्वत:चे नांव वडिलांचे नांव
---------------- ----------------- -----------------

२) उमेदवाराचे नावात बदल असलेस :- आडनांव स्वत:चे नांव वडिलांचे नांव
--------------- ------------------ ---------------

३) लग्नानंतर नाव बदलेले असल्यास ( महिला उमेदवारासाठी गॅझेटसह पुरावा जोडावा )
नांव :- ---------------------------------------------------------------------------

४) पत्र व्यवहाराचा पत्ता :-----------------------------------------------------------------

५) जात :- ------------------------ पोट जात :- ---------------------------

६) आवश्यकत्या ठिकाणी ( ✔ ) अशी खुण करावी.

| माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पगस्त | भुकंपग्रस्त | अपंग | अंशकालीन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

७) अर्जदाराची जन्म तारीख (अंकामध्ये) (शालांत प्रमाणपत्राप्रमाणे)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

८) उमेदवाराचे अर्ज स्विकारणेच्या अंतिम दिनांकास दि. ३१.०३.२०१८ इ. रोजी असलेले वय.

| वय वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

९) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय?(डोमीसाईल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे).- होय / नाही

१०) अर्जदार स्त्रि आहे कि पुरुष ? ( स्त्रि ) / ( पुरुष ) - ( विवाहीत ) / ( अविवाहीत )

११) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता ( उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचा तपशिल )

| शेक्षणिक पात्रता | परीक्षा मंडळाचे नांव | उत्तिर्ण होण्याचे वर्ष | एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१२) नाव नोंदणी केलेल्या सेवायोजन कार्यालयाचे नांव :- --------------- नोंदणी क्रमांक --------------- व
दिनांक :- / /

वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक आहे. मी प्रमाणित करतो/करते कि अर्जात नमद केलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आलेस अर्ज अपात्र करणेस, नोकरी मागविण्यास व त्या अनुषंगाने होणा-या इतर कारवाईस मी पात्र व बांधील राहीन.

ठिकाण :- सही/-

अर्जदाराचे संपुर्ण नांव:--------------------------------

दिनांक :- / /२०१

----------x---------------x------------------x----------------x------------------x----------टिप :-
जाहिरातीमध्ये पदासाठी विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता व अटीनुसार आवश्यकतेनुसार कागदपत्रांच्या सत्यप्रती, जात प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक असणा-या कागदपत्रांच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडाणे बंधनकारक राहील अन्यथा अर्ज अपात्र ठरविणेत येईल.

| | |
|---|---|
| राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशाला, (चंबुखडी) शिंगणापूर, ता- करवीर, जिल्हा- कोल्हापूर. | प्रवेशपत्र - २०१७.<br>अहस्तांतरणीय |
| उमेदवाराचे संपुर्ण नांव :- ---------------------------------------------------<br><br>अर्ज केलेल्या पदाचे नांव :- **कंत्राटी मैदानी क्रीडा प्रशिक्षक (ॲथलेटीक्स)**<br><br>उमेदवाराची स्वाक्षरी | उमेदवाराने अलिकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो लावावा व तो राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकित करावा. |
| | सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर. |